


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २५३ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२० जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्राच्या विकासाला मिळणार गती-आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याचे फलित

## गोंडवाना विद्यापीठ उपकेंद्रासाठी ४१४ कोटींच्या प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरी

## मुल शहराला मिळणार शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी महत्त्वाच्या बैठकीत दिले निर्देश



**चंद्रपूर (राकेश शिंगरू) : राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीचा ध्यास घेतला आहे. त्यादृष्टीने त्यांनी सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आणि त्यात त्यांना यशही आले आहे. शिक्षण क्षेत्राच्या विकासालाही त्यांच्या प्रयत्नांमुळेच गती मिळणार आहे. यासंदर्भातील एक मोठा निर्णय अलीकडेच झाला. आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे चंद्रपूर जिल्ह्यातील उपकेंद्र चंद्रपूर शहरात सुरू करण्यासह मुल शहरात नवीन शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावाला देखील मंजुरी मिळाली आहे.**



विदर्भातील युवकांचे भविष्य उज्वल करण्यासाठी व शिक्षण क्षेत्रात भरीव प्रगती साधण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील या दोन महत्त्वपूर्ण मागण्यांवर सकारात्मक पाऊल पडले आहे. या संदर्भातील बैठक अलीकडेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेत मुंबईतील सुवर्णगड या शासकीय निवासस्थानी पार पडली. या बैठकीस आ.सुधीर मुनगंटीवार यांची प्रमूख उपस्थिती होती. यासोबत उच्च शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, गोंडवाना विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच विविध यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत दोन्ही विषयांवर सकारात्मक चर्चा झाली असून, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दोन्ही प्रस्तावांना त्वरित कार्यवाहीसाठी स्पष्ट निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे, गोंडवाना विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी तब्बल ४१४ कोटींच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्याचा ऐतिहासिक निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. हा प्रस्ताव पुढील प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील युवकांना दर्जेदार उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच जिल्ह्यातील युवकांना आता शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे रोजगारक्षम शिक्षणाचे दालन खुले होईल आणि जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा स्तर भक्कमपणे उंचावणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.चंद्रपूरच्या शिक्षण विकासाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल युवकांच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहणारे ठरणार आहे, असा विश्वास नागरीकांमध्ये व्यक्त करण्यात येत आहे.

# शेतीच्या वादातून मुलाकडून पित्याची कुऱ्हाडीने निर्घृण हत्या



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेगाव (बु.) येथे शनिवार (दि. १९ जुलै) सकाळी सुमारास घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेत मुलानेच आपल्या जन्मदात्या वडिलांची शेतीच्या वादातून कुऱ्हाडीने हत्या केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अभय गुलाबराव दातारकर (वय ३५) याने विठ्ठल मंदिर वॉर्डातील आपल्या राहत्या घरी वडील गुलाब दातारकर (वय ६५) यांच्याशी शेतीच्या कारणावरून वाद घातला. वाद विकोपाला गेल्यानंतर अभयने अचानक कुऱ्हाड उचलून वडिलांच्या डोक्यावर व तोंडावर वार करत त्यांचा जागीच खून केला. घटनेची माहिती मिळताच शेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे पाठवला. दरम्यान, पोलिसांनी आरोपी अभय दातारकर याला अटक केली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक यादव हे पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## खासदार प्रतिभा धानोरकर यांचा बीएसएनएलला सजग इशारा

# ग्रामीण भागात दर्जेदार सेवा पोहोचवा बीएसएनएलचे अच्छे दिन’ आणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात भारत संचार निगम लिमिटेड च्या सेवेचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली दूरसंचार सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत बीएसएनएलच्या कार्यपद्धतीवर चिंता व्यक्त करत, ग्रामीण भागात मोबाईल सेवा व ब्रॉडबँड सुविधा पोहोचवण्यासाठी अधिकाऱ्यांना ठोस सूचनांचा पाढा त्यांनी वाचला.

बैठकीत बोलताना खासदार धानोरकर म्हणाल्या, बीएसएनएल ही केवळ एक कंपनी नाही, तर ती देशातील लाखो नागरिकांच्या संवादाची साखळी आहे. कर्मचाऱ्यांनी ही नोकरी नव्हे तर जनसेवा समजून काम केले, तर नक्कीच परिस्थितीत आमूलाग्र बदल घडू शकतो.

विशेषतः ग्रामीण भागातील वाढती डिजिटल गरज लक्षात घेता, प्रत्येक गावात सतत उपलब्ध इंटरनेट सेवा पुरविण्याचे आदेश त्यांनी दिले. अनेक गावांमध्ये सेवा खंडित होणे, पावसाळ्यात अडथळे येणे, तुटलेल्या तारा, बंद पडलेले टॉवर्स आणि बँकांच्या ठप्प झालेल्या सेवा याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विसापूर आणि जिवती तालुक्यातील सेवा स्थितीबाबत तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी बीएसएनएलचे वरिष्ठ अधिकारी



प्रांजल ठाकूर, एन. एम. टेंगशे, डी. जी. घोंगडे, काजल डे तसेच दूरसंचार सल्लागार समितीचे सदस्य पांडुरंग आगलावे, देविदास सातपुते, ताजुद्दीन शेख, पवन मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार धानोरकर यांनी ४जी सेवा संपूर्ण जिल्ह्यात लवकरात लवकर सुरु करावी, तसेच खाजगी कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी ५जीच्या दिशेने वाटचाल करताना गुणवत्तेवर भर देण्याचे आदेशही दिले. भारत नेट व महानेट-१ प्रकल्पांचा प्रभावी उपयोग करून ग्रामपंचायतींपर्यंत पोहोचलेल्या फायबर नेटवर्कचा उपयोग स्थानिकांना डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून करून देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

बैठकीच्या अखेरीस त्यांनी जुनी व कालबाह्य उपकरणे तात्काळ बदलून प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत दर्जेदार सेवा पोहोचवण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले.

# ऑनलाइन गेमिंग ॲप्सवर बंदी आणण्या साठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा होणार

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांची कारवाई



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जंगली रमी, ड्रीम इलेव्हन , एमपीएल, माय इलेव्हन सर्कल सारख्या ऑनलाइन गेमिंग ॲप्समुळे युवकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असून, त्यांच्यात जुगाराची सवय बळावत चालली आहे, असा गंभीर इशारा आमदार किशोर जोरगेवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात दिला. त्यांच्या या मुद्द्यावर प्रतिसाद देताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याचे स्पष्ट केले. जोरगेवार म्हणाले की, या ॲप्सच्या माध्यमातून युवकांना आकर्षित करून त्यांचं आर्थिक, मानसिक नुकसान होत आहे. टीव्हीवर या ॲप्सच्या जाहिराती नामवंत सेलिब्रिटींमार्फत दाखवल्या जातात, जे दुर्दैवी आहे. त्यांनी याप्रकरणी कठोर कायदेशीर कारवाईची मागणी सभागृहात केली.

यावर बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, या प्रकारावर कायदा करण्याचा अधिकार राज्य सरकारकडे नाही, मात्र केंद्र सरकारकडे सतत पत्रव्यवहार करत आम्ही ठोस उपाययोजना करण्याचा आग्रह धरला आहे. त्याचबरोबर, राज्यातील आत्महत्यांचे व गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याचे दाखले देताना जोरगेवार यांनी नमूद केले की, राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार केवळ ९७ गुन्हे दाखल झाले असले तरी प्रत्यक्षात ही संख्या कित्येक पटीने अधिक आहे. या मुद्द्यांवर सरकारने गांभीर्याने दखल घेतली असून, संबंधित उपाययोजना लवकरच दिसून येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मिसिंग सेलच्या माध्यमातून बेपत्ता महिलांचा शोध

**अधिवेशनातच बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्यभरात आणि चंद्रपूर जिल्ह्यात महिलांचे व मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अशा प्रकरणांचा तपास गतीने व्हावा म्हणून राज्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यात ‘मिसिंग सेल’ कार्यान्वित करण्यात आला आहे.**

# चंद्रभागेत ३ महिला भाविक बुडाल्या:भोकरदनच्या दोघींचे मृतदेह आढळले, एक बेपत्ता

**सोलापूर (वृत्तसंस्था)**–पंढरपुरातील चंद्रभागा नदीत बुडून ३ महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी २ महिलांचे मृतदेह आढळले असून, एकीचा शोध सुरू आहे. मृतांपैकी दोघी जालना जिल्ह्यातील भोकरदनच्या असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे पंढरपुरावर शोककळा पसरली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, उजनी धरणातून पाणी सोडल्यामुळे चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे भाविकांसोबत बऱ्यावाईट घटना घडत आहेत. शनिवारी सकाळी ७ च्या सुमारास ३ महिला भाविक चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या. यात जालन्याच्या भोकरदन येथील २ महिलांसह एका अनोळखी महिलेचा समावेश होता. त्या नदीत उतरल्या, पण पाण्याचा अंदाज न आल्याने त्या वाहून जाऊ लागल्या. ते पाहून नदीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या इतर महिला भाविकांनी आरडाओरडा सुरू केला. पण पाण्याचा वेग जास्त असल्यामुळे मदत येईपर्यंत तिन्ही महिला बुडाल्या.त्यानंतर पोलिसांनी स्थानिक कोळी



बांधवांच्या मदतीने मदतकार्य सुरू केले. त्यात सुनीता सपकाळ (४३) व संगीता सपकाळ (४०) या दोन महिलांचे मृतदेह आढळले. या दोन्ही महिला जालन्याच्या भोकरदन येथील रहिवासी आहेत. तर इतर एका अनोळखी महिलेचा शोध सुरू आहे.

# चंद्रपूरात मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त आज पासूनदेवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह

## आ.जोरगेवार यांचा पुढाकार,सायकल वाटप,महारुद्राभिषेक यासह १० दिवस चालणार ३३४ विविध कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २० जुलैपासून देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. आज १० रक्तदान शिबिरे, ३ ठिकाणी धार्मिक स्थळी महाआरती, ७ ठिकाणी योग शिबिरे आणि ७ ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या आयोजनातून या सेवा सप्ताहाला सुरवात होणार आहे. पुढील १० दिवसात चंद्रपूर मतदारसंघात तब्बल ३३४ वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून या सेवासप्ताहाला एक व्यापक आणि लोकाभिमुख स्वरूप देण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान आरोग्य,शिक्षण,महिला सक्षमीकरण,सामाजिक समरसता,अध्यात्म व संस्कृती अशा विविध क्षेत्रातील उपक्रम राबवले जात असून,शहर आणि ग्रामीण परिसरातील जनसामान्यांपर्यंत थेट पोहोचणारे उपक्रम या निमित्ताने पार पडत आहेत.

सप्ताहात शहरातील अनेक ठिकाणी वृक्षारोपण मोहीम,गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,अल्पसंख्याक समाजासाठी उपक्रम,तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनप्रवासावर आधारित चित्रप्रदर्शन व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमधून सामाजिक भान निर्माण करण्याबरोबरच नागरिकांना थेट लाभ मिळावा,हा मुख्य उद्देश असल्याचे आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

सदर सेवासप्ताहात २८ जुलै रोजी महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या भिवापूर वार्डातील प्राचीन शिवलिंगाजवळ महारुद्राभिषेक आणि जलाभिषेक सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यात राज्यभरातील ५५ पवित्र नद्यांचे जल अर्पण करून धार्मिकतेसोबत पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.

२७ जुलै रोजी शकुंतला लॉन येथे आयोजित भव्य आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विविध तपासण्या,रक्त व नेत्र तपासणी तसेच मोफत औषध वितरण करण्यात येणार आहे. तर २९ जुलै रोजी त्याच लॉनमध्ये २,०५५ शाळकरी विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात येणार असून,शिक्षणात सातत्य राखण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.या सेवासप्ताहात विविध संस्था,स्वयंसेवी कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग दिसून येत असून,संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात या उपक्रमांमुळे एक सकारात्मक सामाजिक चळवळ निर्माण होत आहे. लोककल्याणाच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या या सप्ताहामुळे आरोग्यविषयक जागरूकता,शैक्षणिक प्रोत्साहन आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



# धैर्यशील दादा पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रोहातील युवक-महिलांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**रोहा । प्रतिनिधी**

राज्यसभा खासदार व भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा पाटील यांच्या प्रेरणादायी नेतृत्वावर विश्वास ठेवत रोहा तालुक्यातील अनेक युवक आणि महिलांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. हा पक्षप्रवेश कार्यक्रम पेण येथील दादा पाटील यांच्या निवासस्थानी त्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



या कार्यक्रमाचे आयोजन भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग आणि भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगडचे सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर जाधव, दिपा कासार, तन्वी गुरव, तेजस महागावकर, सागर जोगडे, सौरभ जोगडे, तुषार जंगम, शिवम जंगम आदींनी जाहीर पक्षप्रवेश केला.प्रवेशकर्त्यांचे स्वागत करताना धैर्यशील दादा पाटील यांनी नव्याने भाजपमध्ये दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत त्यांना पक्षाच्या धोरणांची ओळख करून दिली.

कार्यक्रमावेळी वैभव कुळकर्णी, परेश चितळकर, धीरज मोंडे, रिया कासार, निखिल बोरोले आणि इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.या पक्षप्रवेशामुळे रोहा तालुक्यातील भाजप संघटन अधिक बळकट होणार आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

# प्रियदर्शनी पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर व प्रियदर्शनी पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, भिंगार, अहमदनगर यांच्या संयुक्त विदयमाने शुक्रवार, दिनांक ११/०७/२०२५ रोजी प्रियदर्शनी पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, भिंगार येथे कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. एम. एच. शेख, जिल्हा न्यायाधीश-३ व अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर हे होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना कायदा व कायद्याचे कामकाज कसे चालते या विषयी माहिती दिली. तसेच त्यांनी लोकसंख्या वाढीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले- जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. कृष्णा एम. सोनावणे यांनी पोस्को कायद्याअंतर्गत न्याय आपल्या दारी यातून कायदेविषयक मार्गदर्शन करून बालकांच्या हक्का विषयी जागृती केली. बाल हित कायदे, नालसा टोल फ्री क्रमांक १५१०० व बालकांसाठी बालस्नेही योजना या विषयी माहिती सांगितली. तसेच पोस्को कायद्याबाबत विदयार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. ॲड. श्री. राजाभाउ शिर्के यांनी तस्करी पासून बाल संरक्षण व मोबाईलच्या विळख्यातून बालकांची सुटका यासाठी बालस्नेही संघाचे उपक्रम सांगितले. बाल अत्याचार, सामाजिक स्थिती, विविध उदाहरणाद्वारे बाल संरक्षण विषयी विद्यार्थ्यांची मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास ॲड. श्री. सागर पादीर, ॲड. श्री. आनंद सुर्यवंशी, संस्थेचे अध्यक्ष, श्री. बाळासाहेब खोमणे, शाळेच्या प्राचार्य अंजली बोधक मॅडम, उपप्राचार्य अमोल घोरपडे, प्रियदर्शनी पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, भिंगार यांचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सदर शिबीर यशस्वी करणेकामी प्रियदर्शनी पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय भिंगार यांचे कर्मचारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# इंदापूर तालुक्यातील उमर शेख चे जिल्हा गुणवत्ता यादीत यश

## शहा गावाचे नाव उज्वल

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

इंदापूर तालुक्यातील शहा गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी मोहंमदउमर समीर शेख याने शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत २५६ गुणांसह स्थान पटकावले आहे. या यशामुळे शहा गावासह संपूर्ण तालुक्यातून उमरवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शिष्यवृत्ती परीक्षेसाठी उमर शेख याने मेहनतीने तयारी केली होती. या परीक्षेचे विशेष मार्गदर्शन शिक्षक इशरत मोमीन यांनी केले. यश मिळवलेल्या उमरचे मुख्याध्यापक आबासाहेब शिंदे, शिक्षक गणेश मोरे, मैनुद्दीन मोमीन, सुवर्णा शिंदे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.शासकीय शाळेतील विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या सुप्त प्रतिभेला योग्य दिशा दिल्यास तेही गुणवत्ता यादी गाठू शकतात, हे उमरच्या यशातून पुन्हा सिद्ध झाले आहे.

# शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रमात संघर्ष पत्रकार संघाचा पुढाकार; वेहळोली बु.शाळेतील विद्यार्थ्यांचा गौरव

**शहापूर । रविंद्र धारवणे**

संघर्ष पत्रकार संघाच्या वतीने मौजे वेहळोली बुद्रक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा स्तुत्य उपक्रम नुकताच पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर शिक्षक व ग्रामस्थांनी संघाच्या उपक्रमाचे कौतुक केले.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संघर्ष पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष योगेश हजारे यांनी भूषवले. यावेळी संघाचे शहापूर तालुका अध्यक्ष विठ्ठल धारवणे, तालुका सचिव अंकुश भोईर, माजी अध्यक्ष रविंद्र सोनावळे, पत्रकार संजय फर्डे, निलेश विशे, प्रसाद भोईर, दिनेश पाचघरे, जयवंत भडांगे, नामदेव किरपण, रुपेश जाधव यांच्यासह अन्य मान्यवर पत्रकार उपस्थित होते.

स्थानिक पातळीवर कार्यक्रमात वेहळोली बु. ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय भावार्थ, सदस्य हरीचंद्र भगत, माजी सदस्य वसंत वाघ, ज्येष्ठ ग्रामस्थ पंढरी भेरे, भास्कर भेरे, रमेश हजारे, जगन हजारे, महेश किरपण, अर्जुन जाधव, विकी जाधव, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष कांतीलाल हजारे यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतील सर्व महिला शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या समर्पणामुळे संपूर्ण उपक्रमात शिस्त, उत्साह आणि आत्मीयता दिसून आली.

विद्यार्थ्यांना दिल्या गेलेल्या साहित्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवासात नवे बळ मिळेल आणि अशा सामाजिक उपक्रमांमुळे पत्रकारितेचा लोकहितार्थ चेहरा उजळतो, असे मत उपस्थित ग्रामस्थ व पालकांनी यावेळी व्यक्त केले.

# शिऊरमध्ये देवत्वाचा ढोंग करणाऱ्या भोंदूबाबा चा पर्दाफाश; अंधश्रद्धा विरोधात गुन्हा दाखल

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

जागृत स्थळाचा देव असल्याचा दावा करत भोळ्याभाबड्या नागरिकांना फसवणाऱ्या एका भोंदूबाबाचा भांडाफोड झाला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या सतर्क कारवाईमुळे पोलिसांनी सदर भोंदूबाबाविरुद्ध महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व काळी जादू प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार वैजापूर तालुक्यातील शिऊर गावात घडला.



संशयिताचे नाव संजय रंगनाथ पगार (रा. शिऊर) असे असून, तो स्वतःला जागृत स्थळाचा देव असल्याचे भासवत होता. त्याने गावातील सामान्य नागरिकांना आपल्या स्थळी बोलावून त्यांच्या व्याधींवर उपचार करण्याचे नाटक उभे केले होते. मात्र या कथित उपचारांच्या नावाखाली तो विविध अघोरी, मानसिक त्रासदायक कृती करत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

या संशयास्पद उपचारांची माहिती अंनिसच्या कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी भेट देत संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ चित्रिकरण केले. या व्हिडिओमध्ये संजय पगार हा रुग्णांच्या चेहऱ्यावर बूट ठेवताना, ढोलकी वाजवत अलख निरंजन चा घोष करत झटके देताना दिसून येतो. इतकेच नव्हे तर तो पीडितांच्या दुःखांवर उपाय असल्याचे सांगून त्यांच्याकडून पैसे घेत असल्याचेही या पुराव्यातून समोर आले आहे.अंनिसच्या कार्यकर्त्यांनी मिळवलेला व्हिडिओ पुरावा पोलिसांच्या स्वाधीन केल्यानंतर सरकारतर्फे फिर्याद दाखल करण्यात आली. त्यानंतर शिऊर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन आणि काळी जादू प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या कायद्यानुसार, भोंदूपणा, अघोरी उपचार, जादूटोणा, किंवा कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेचे प्रसार किंवा प्रोत्साहन करणे हा दंडनीय गुन्हा असून, दोषी आढळल्यास शिक्षेची तरतूद आहे. पोलिसांनी या प्रकरणी अधिक तपास सुरू केला आहे.

# शेतकरी महिलांसाठी एकता महिला मंच तर्फे मार्गदर्शन मेळावा संपन्न

## कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे प्रदीपकुमार गोंजारी यांचे सखोल मार्गदर्शन

**बार्शी । प्रतिनिधी**

बार्शी तालुक्यातील सारोळे गावात दिनांक १९ जुलै २०२५ रोजी 'एकता महिला मंच'च्यावतीने शेतकरी महिलांसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.




या मार्गदर्शन मेळाव्यात कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथील प्रदीपकुमार गोंजारी यांनी महिलांना सेंद्रिय शेतीसंदर्भात सखोल माहिती दिली. त्यांनी फलविक ॲसिड द्रावण, ह्युमिक ॲसिड, वेस्ट डी-कंपोजर, दशपर्णी अर्क, जीवामृत, गांडूळ खत पाणी, मासे गुळ नत्र मिश्रण, निंबोळी अर्क इत्यादींचा शेतातील योग्य वापर कसा करावा, याबद्दल सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

सेंद्रिय शेतीत महिलांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांना योग्य प्रशिक्षण व माहिती मिळाल्यास शेतीच्या उत्पादकतेत निश्चित वाढ होऊ शकते, असे गोंजारी यांनी यावेळी सांगितले. उपस्थित महिलांनीही या मार्गदर्शन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमात एकता महिला मंचच्या विविध गावांतील सदस्यांनी उपस्थिती लावली. प्रमुख उपस्थितीत प्रभाकर क्षीरसागर, प्रभावती साबळे, स्वाती चौधरी, पूजा भोसले, प्रिया गाटे, सोनाली मुंबरे, पार्वती चौधरी, रेश्मा करंडे, निर्मला साळुंखे, महानंदा विभूते, गुणवंती चौधरी, सुमन भोसले, कौशल्या भगत, उषा साबळे, संगीता शेरखाने, लक्ष्मी भोसले, रंजना चौधरी, मेघा मुंबरे, रिंका भोसले, ज्योती गाटे, सुनिता लोंढे, सारिका मुंबरे, शिवकांता उबाळे, भाग्यश्री गाटे यांच्यासह गावातील अनेक महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती गाटे यांनी तर आभार प्रदर्शन पूजा भोसले यांनी केले.हा कार्यक्रम महिलांच्या आत्मविश्वासात भर घालणारा ठरला असून, भविष्यात अधिकाधिक महिलांना शेतीत सशक्त करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करावे, अशी मागणी महिलांमधून पुढे आली.

# ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला.

यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मूंदगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर,अंबाजोगाई) हे होते.

यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले. या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रसमस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.

# पुलगाव बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद; व्यापाऱ्यांचा शांततेत बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग



**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव, नाचणगाव व गुंजखेडा परिसरातील नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'मी पुलगावकर' या सामाजिक मंचाच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला आज मोठा जनसमर्थन लाभले. 'पुलगाव बंद' या आंदोलनाच्या टप्प्यात नागरिक व व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शहरातील बहुतेक व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत आंदोलनास पाठिंबा दर्शवला. बंद दरम्यान संपूर्ण परिसरात शांतता आणि सलोखा राखला गेला.

'मी पुलगावकर' या बॅनरखाली गेल्या सहा दिवसांपासून पुलगावमधील नागरिक व सामाजिक कार्यकर्ते विविध स्वरूपाचे आंदोलन करत आहेत. यात आमरण उपोषण, साखळी उपोषण, रक्तदान शिबिर आणि चक्काजाम आंदोलन यांचा समावेश आहे. या लोकशाही मार्गाने चालणाऱ्या आंदोलनाचा उद्देश पुलगाव परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधून त्या त्वरित सोडवण्याचा आहे. आजच्या बंदच्या पार्श्वभूमीवर आमरण उपोषणकर्ते अंकुश कोचे, गजानन पचारे, तसेच साखळी उपोषणकर्ते मनीष साहू, बंटी ढगे, संदीप कुचे, विकी पाखरे, विनोद दुबे, प्रफुल्ल कुंबरे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते – साबिर कुरेशी, राजू लोहकरे, श्याम देशमुख, गोविंद दैय्या, पुंडलिक पांडे, दिनेश शर्मा, चंद्रकांत पवार यांनी पुलगावच्या मुख्य रस्त्यांवरून जाऊन व्यापाऱ्यांना व नागरिकांना शांततेत बंद पाळण्याचे आवाहन केले. त्यांच्या या संयमित आणि समन्वयपूर्ण प्रयत्नाला व्यापाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली.पुलगावमध्ये आज चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी दक्षता घेतली. आंदोलनकर्त्यांनी संयम राखून शांततेने आपली भूमिका मांडल्याने बंद यशस्वीपणे पार पडला.

'मी पुलगावकर' या मंचाच्या पुढाकारामुळे विविध राजकीय विचारांचे लोक एकत्र येऊन नागरिकांच्या प्रश्नांवर एकमुखाने आवाज उठवत आहेत. यामुळे या लोकशाही मार्गाने होणाऱ्या लढ्याला आता व्यापक स्वरूप प्राप्त होत असून प्रशासनाला लवकरात लवकर सकारात्मक पावले उचलण्याची गरज आहे.

# एक पेड माँ के नाम अभियानाअंतर्गत आर्वी शहरात भाजप बूथ क्र.१६२ च्या वतीने वृक्षारोपण

**आर्वी । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या एक पेड माँ के नाम या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत भारतीय जनता पक्ष बूथ क्रमांक १६२, आर्वी शहर यांच्यातर्फे संतोषी माता मंदिराजवळील खुल्या जागेत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात भाजप आर्वी विधानसभा अध्यक्ष सन्मानीय विजय वाजपेयी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. अभियानाच्या संयोजिका सारिखा लोखंडे यांनी या उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. बूथ प्रमुख विष्णुप्रसाद भारती यांनी संपूर्ण नियोजन करून उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.



कार्यक्रमात मोठ्या संख्येने बूथ सदस्य आणि पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी बोलताना विष्णुप्रसाद भारती म्हणाले, स्वच्छ, हरित आणि निरोगी पर्यावरण घडवण्यासाठी प्रत्येकाने एक झाड लावणे व त्याची जपणूक करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. 'हरित आर्वी' या संकल्पनेच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो आपल्या लोकप्रिय आमदार सुमितदादा वानखेडे यांच्या नेतृत्वात साकार होतो आहे.ते पुढे म्हणाले, प्रत्येकाने एक झाड लावावे आणि आई आपल्या मुलाची जशी काळजी घेते, तशीच झाडांचीही घ्यावी. भविष्यात ही झाडे फळ देतील, छाया देतील आणि आपले पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील.

या प्रसंगी विजय वाजपेयी यांनी एक पेड माँ के नाम अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करताना म्हटले, हे केवळ वृक्षारोपण नसून पर्यावरण रक्षणाचा संकल्प आहे. प्रत्येक नागरिकाने यात सहभागी व्हावे.सोमेश्वरजी मांडवकर, धीरज पानसे, विलास कातोडे, सुहास ठाकरे, किसन परतेकी, मंगेश गोडे, गणेश बांगरे, शुभम पवार, राधिका भारती, अर्चना मांडवकर, वंदना कातोडे, रजनी गोडे, पूजा मांडवकर, पारबत्ती कुलमेथी, माधुरी गोडे, राऊतताई, लता परतेकी आदी कार्यकर्ते व बूथ सदस्य उपस्थित होते.

# ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसा निमित्त भरघोस कार्यक्रमाचे आयोजन



**केज । प्रतिनिधी**

कळंब पासून अवघ्या १५ किमी अंतरावर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील बोरगाव (बु.) हे गाव. गावातील युवक खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या कार्यशैलीने प्रभावित आहेत. खासदारांच्या जनसामान्यांच्या अडचणीला धावून जाण्याच्या आणि तत्परतेने कामे मार्गी लावण्याच्या शैलीने येथील युवकांना भुरळ घातली आहे. त्यामुळे येथील तरुणांनी एकत्र येऊन खासदारांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप बोरगाव येथील जि. प. प्राथमिक शाळेत केले. या कार्यक्रमाचे आयोजन दिनेश गव्हाणे, निलेश निंगुळे, अशोक गव्हाणे, धनंजय गव्हाणे, अर्जुन खडके, करण कवडे, गणेश गव्हाणे, ज्ञानेश्वर वळेकर, श्रीराम निंगुळे, योगेश रानमाळ, अमरसिंह गव्हाणे आणि शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमित गव्हाणे यांनी केले. शाळा उपयोगी शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

खासदारांना अनभिज्ञ ठेवत त्यांच्या वाढदिवसाचा असा हा आगळा वेगळा सोहळा बोरगांव येथील युवकांनी साजरा केला. आणि त्यांना वाढदिवसानिमित्त दिर्घायुष्याच्या आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कापूस उत्पादक महिलांसाठी राबविण्यात आलेल्या पोषण प्रकल्पाचा वर्ध्यात राज्यस्तरीय आढावा

## महिलांमध्ये पोषण, स्वच्छता आणि सेंद्रिय शेतीविषयी वाढलेली जागरूकता

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा व गुजरातमधील भुज जिल्ह्यातील कापूस उत्पादक महिलांसाठी राबविण्यात आलेल्या पोषण प्रकल्पाचा राज्यस्तरीय आढावा नुकताच वर्धा येथे घेण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांमध्ये पोषण, आहारातील विविधता, स्वच्छता, परसबाग शेती आणि सेंद्रिय शेती यासंदर्भात महत्त्वपूर्ण जागृती झाली असून गावपातळीवर सकारात्मक बदल घडून आले आहेत.ही कार्यशाळा डब्ल्यूएचएच, जीआयझेड, स्वयं शिक्षण प्रयोग आणि वेल्सपण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हॉटेल हिल टॉप, वर्धा येथे पार पडली. कार्यशाळेचे प्रास्ताविक स्वयं शिक्षण प्रयोगच्या प्रोग्राम मॅनेजर तबसुम मोमीन यांनी केले. वर्धा व भुज येथील प्रत्येकी ३४ गावांमधील अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि गाव लीडर यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यांनी आपल्या गावात पोषण जागृती मोहिमा राबवल्यामुळे गावकऱ्यांनी परसबाग तयार करणे, स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे, घरगुती



सेंद्रिय खते वापरणे व आहारात विविधता वाढवणे सुरू केले आहे.

कार्यशाळेनंतर उपस्थित मान्यवरांनी शिवणगाव येथे बायोगॅस युनिट, अझोला टँक, पोषण बागा आणि सेंद्रिय शेती प्रकल्पांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. या कार्यक्रमात अंशुमन दास (कृषी तज्ज्ञ, थक्क), श्वेता बॅनर्जी (पोषण तज्ज्ञ), ज्योतिष गोयंक (शेती सल्लागार, त्रख्खन), हरीभाई मोरी आणि राजेंद्र पेटकर (बजाज फाउंडेशन), सुशांत पाटील (नाबार्ड), प्रधन्य ब्राह्मणकर, प्रतीक मुनेश्वर (उमेद), तसेच वेल्सपण फाउंडेशन, स्वयं शिक्षण प्रयोग व इतर संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे जीआयझेडचे तसेच डब्ल्यूएचएचचे रोजीस्टा, ईशा बॅनर्जी व स्वयं शिक्षण प्रयोगचे प्रोग्राम डायरेक्टर उपमन्यू पाटील यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिरामण गवई, सुधाकर गोसावी, वसुंधरा भगत, रमेश जामलेकर व रवी नाईक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पत्रकार शाम उपाध्याय यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध

## दोषींवर कठोर कारवाई करण्याची पत्रकार संघाची मागणी

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेतील गैरप्रकार उघडकीस आणणाऱ्या पत्रकार शाम उपाध्याय यांच्यावर तांदूळ माफियांनी केलेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या घटनेचा पुलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ पुलगाव पोलीस निरीक्षक यशवंत सोळसे यांना पत्रकारांच्या शिष्टमंडळाने निवेदन सादर करून दोषींवर कठोर आणि त्वरित कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.प्राप्त माहितीनुसार, वर्धा जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून विशेषतः तांदळाचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार केला जात असल्याची माहिती काही स्थानिक पत्रकारांनी वेळोवेळी उघडकीस आणली होती. मात्र, या धान्य माफियांना उघड करण्यात येणाऱ्या या पत्रकारितेचा सूड म्हणून ८ जुलै २०२५ रोजी रात्री वर्धा–पुलगाव मार्गावरील सालोड गावाजवळ पत्रकार श्री. श्याम उपाध्याय यांच्यावर त्यांचे वाहन बिघडल्याचा फायदा घेत काही माफियांनी अचानक हल्ला चढवला. हा हल्ला केवळ एका पत्रकारावर नसून, सत्य उघड करणाऱ्या पत्रकारितेवर आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेला गंभीर आघात आहे, असे पत्रकार संघाच्या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.निवेदनात सांगण्यात आले की, वर्धा जिल्ह्यातील धान्य माफियांचे जाळे खोलवर पसरलेले असून, त्यांना काही अधिकारी, ठेकेदार आणि दुकानदारांचे सक्रिय समर्थन मिळत असल्याचा संशय नाकारता येत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची कसून चौकशी होणे अत्यावश्यक आहे.

पत्रकार संघाने प्रशासनासमोर खालील महत्त्वाच्या मागण्या मांडल्या:

१. पत्रकार शाम उपाध्याय यांच्यावर हल्ला करणाऱ्या तांदूळ माफियांवर कठोर आणि तात्काळ कारवाई करण्यात यावी.


२. वर्धा जिल्ह्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करून काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक उपाययोजना राबविण्यात याव्यात.

३. पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेतली जावी व त्यांना संरक्षण मिळावे.

४. जिल्ह्यातील तांदूळ माफियांना हद्दपार करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली जावी.

या निवेदनाद्वारे पत्रकार संघाने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, जर या घटनेची गांभीर्याने दखल घेण्यात आली नाही, तर आगामी काळात व्यापक आंदोलन उभारले जाईल. निवेदन देताना पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक भार्गव, सावरिया मारोठीया, अविनाश भोपे, आशिष साहू, अमिन ओलिया, जय महल्ले, हर्षल काळे, चंद्रकांत पवार, पंकज तिवारी, नितीन चरडे आदी पत्रकार उपस्थित होते.

# एकमेकांविषयी आदरभाव असल्यास आनंद द्विगुणित होतो–मुख्य अभियंता जे.डी.टाले



**वर्धा । प्रतिनिधी**

काही उच्चपदस्थ अधिकारी आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांना आपल्या परिवारातील सदस्यांप्रमाणे वागणूक देतात म्हणून जिव्हाळा आधी आस्थेचे ऋणानुबंध टिकवून ठेवणारे हे अधिकारी कर्मचाऱ्यांकरिता कायम आदरणीय ठरतात.


शासकीय कामकाज एक संघिक कार्य आहे त्यामुळे आपसात एकमेकांविषयी आदर भाव असला तर शासकीय कामकाजाच्या कार्यपूर्तीचा आनंद द्विगुणीत होतो. वर्धेत असताना येथील कर्मचारी व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळीं तर्फे मला मिळणारा आदर हे माझ्यासाठी अविस्मरणीय ठरणारी बाब असून माझ्या यशस्वी शासकीय कामकाजाचे ते गमक आहे. असे प्रतिपादन जलसंपदा विभाग अमरावतीचे मुख्य अभियंता जे. बी. टाले यांनी व्यक्त केले.ते शासकीय विश्रामगृह वर्धा येथे निसर्ग सेवा समिती व ऑल इंडिया शास्त्रीफोरम तर्फे छोटेखानी सत्कार समारंभात बोलत होते. याप्रसंगी त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, माझी उपविभागीय अभियंता विजय नाखले, ऑल इंडिया शास्त्री फोरम चे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, राजेश धोपटे, विलास कुलकर्णी डॉ. टाले, जी. वी. रेड्डी, राजेश शर्मा, नरसिंह रेड्डी, डॉ. संकेत नाखले, राजू लभाने आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी म्हटले म्हणजे सत्ता आणि अधिकार याच्या जोरावर असलेला त्यांचा दरारा लक्षात येतो. मुख्य अभियंता जे बी टाले त्यांच्या गाठीभेटीने आनंदोत्सवाची अनुभूती आली अशी भावना निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी व्यक्त केली. या सत्कार समारंभाला अनेक कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# कवी–गझलकार गंगाधर मुटे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## साहित्य, समाजकार्य व शेतकरी चळवळीत योगदानाची दखल

**वर्धा । प्रतिनिधी**

प्रख्यात शेतकरी नेते, ज्येष्ठ गझलकार आणि अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे प्रणेते गंगाधर मुटे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. चंद्रपूर येथील गझल मंथन साहित्य संस्था या नामवंत संस्थेने मराठी गझलेच्या प्रचार–प्रसारासाठी, साहित्याच्या माध्यमातून समाजजागृती करणाऱ्या आणि साहित्य, समाजकार्य व संघटनात्मक योगदान देणाऱ्या गंगाधर मुटे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर केला आहे. संस्थेचे सचिव जयवंत वानखेडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर पुरस्काराचे वितरण १७ ऑगस्ट २०२५ रोजी पुसद येथे आयोजित एकदिवसीय गझल संमेलनात मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम ५ हजार रुपये असे असेल.गंगाधर मुटे हे वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील आर्वी छोटी या छोट्याशा गावचे रहिवासी असून, १९८२ पासून शेतकरी चळवळीत सक्रीय आहेत. त्यांनी शेतकरी आंदोलनात भाग घेताना अनेकदा तुरुंगवासही भोगला आहे. शेतकरी संघटनेचे वर्धा जिल्हाध्यक्ष, माहिती व तंत्रज्ञान आघाडीचे प्रदेशाध्यक्ष, तसेच स्वतंत्र भारत पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव या पदांवर त्यांनी जबाबदारीने काम पाहिले आहे. ते केवळ राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातच नव्हे, तर साहित्यिक क्षेत्रातही सक्रिय असून, विशेषतः मराठी गझल या काव्यप्रकाराला ग्रामीण, शेतकरी आणि सामाजिक आशय देत एक वेगळे स्थान प्राप्त करून दिले आहे.



त्यांच्या प्रकाशित ग्रंथांमध्ये रानमेवा (काव्यसंग्रह), वांगे अमर रहे (ललित लेखसंग्रह), माझी गझल निराळी (गझलसंग्रह) आणि नागपुरी तडका (काव्यसंग्रह) यांचा समावेश होतो. या पुस्तकांना अनेक साहित्यिक पुरस्कार मिळाले असून, त्यांच्या लेखणीतील ठसठशीत भाषाशैली, प्रहारक शब्दयोजना आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांना राज्यभरात ओळख मिळाली आहे. त्यांच्या तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल, हाण त्याच्या टाळक्यात पायामधला बूट, लेखणीने लढाईस सज्ज व्हावे, दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे, बिपाशाले लुगडं, बळीराजाचे ध्यान, गणपतीची आरती, मोरा नाच रे अशा कविता, गझला, बालगीतं, अंगाईगीतं आणि अभंग महाराष्ट्रभर गाजले आहेत. त्यांच्या लेखनात समाजप्रबोधन, भाषेचा सन्मान, ग्रामीण जीवनाची झळाळी आणि शोषितांचा आवाज यांचे प्रखर प्रतिबिंब दिसते.गंगाधर मुटे यांना मिळणारा जीवन गौरव पुरस्कार हा केवळ त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचा सन्मान नसून, ग्रामीण भागातील एका सामान्य कार्यकर्त्याच्या असामान्य योगदानाची पावती आहे. त्यांच्या लेखणीचा टणकपणा, भाषेची ताकद आणि शेतकऱ्यांच्या जीवनावरचा खोल अभ्यास यामुळे त्यांचे लेखन हे केवळ साहित्य नसून एका सामाजिक परिवर्तनाची हाक आहे. मराठी गझलेच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असून, हा पुरस्कार त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची आणि समर्पित जीवनाची पावती ठरणार आहे.

# मीरा भाईंदरपासून पालघरपर्यंत बनावट अमराठी मतदारसंघ तयार करण्याचा डाव–राज ठाकरे यांचा गंभीर आरोप

**मुंबई । विराम पवार**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मीरा भाईंदर येथे घेतलेल्या जाहीर सभेत राज्यातील बदलत्या लोकसंख्येच्या रचनेवर आणि मराठी अस्मितेच्या प्रश्नी थेट आणि ठाम भूमिका मांडली. मीरा भाईंदरपासून ते पालघरपर्यंतचा परिसर योजनाबद्ध पद्धतीने अमराठी बनवला जात आहे. ही केवळ स्थलांतर नव्हे, तर बनावट मतदारसंघ तयार करण्याचा डाव आहे, असा गंभीर आरोप ठाकरे यांनी केला.सभेत बोलताना ठाकरे म्हणाले, उद्या हेच लोक आपले आमदार, खासदार, महापौर होतील. मुंबईपासून गुजरातपर्यंत एक सुसंगत पट्टा जोडण्याचा प्रयत्न केला जातोय. हिंदुत्वाच्या बुरख्याआड जर मराठी संस्कृती संपवण्याचा डाव असेल, तर माझ्यासारखा मराठी माणूस तुम्हाला रोखायला उभा राहील. ठाकरे यांनी भाषेच्या प्रश्नावरही स्पष्ट भूमिका घेत, मराठी भाषा जर टिकली, तरच मराठी संस्कृती टिकेल. बिहारमध्येही लोक मातृभाषाच बोलतात. हनुमान चालीसा ही हिंदी नव्हे, तर अवधी भाषेत आहे. मी सर्व भाषांचा सन्मान करतो, मात्र कोणतीही भाषा आमच्यावर लादली गेली, तर आम्ही ती मान्य करणार नाही,असे ठासून सांगितले.

ठाकरे यांनी बनावट मतदारसंघ रचनेमागे राजकीय हेतू असल्याचा संशयही व्यक्त केला. ही घडामोड केवळ लोकसंख्या वाढीपुरती नाही. तिच्या मागे सत्ता रचनेचे मोठे राजकारण लपले आहे. स्थानिक भूमिपुत्रांचा हक्क हिरावून घेण्याचा डाव आपण ओळखायला हवा,असा इशारा त्यांनी दिला.छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले, ही सत्ता हिंदी लोकांनी नव्हे, तर इथल्या भूमिपुत्रांनी उभारली होती,असा इतिहासाचा दाखला देत ठाकरे यांनी मराठी अस्मितेचा ठाम आवाज पुन्हा एकदा बुलंद केला.

ठाकरे यांच्या भाषणात महाराष्ट्रातील मराठी भाषिकांची घटती लोकसंख्या, राजकीय हस्तक्षेप, आणि महानगरांतील बदलती लोकशाही रचना या विषयांवर स्पष्टपणे भाष्य करत, मराठी माणूस गप्प राहिला तर त्याचं अस्तित्वच संपेल,असा इशाराही त्यांनी दिला.



# आईच्या नावे हिरवळ विद्यार्थ्यांनी घेतला ममतेचा आणि पर्यावरणाचा अनोखा संकल्प

**पिशोर । जावेद शेख**

आई म्हणजे वात्सल्य, ममता आणि आधाराचा जीवंत शब्द... आणि आता तिच्या सन्मानार्थ हिरवळ वाढवण्याचा अनोखा उपक्रम भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात विद्यार्थ्यांच्या हातून साकार झाला. इको क्लब फॉर मिशन लाईफ अंतर्गत राबवण्यात आलेल्या एक पेड माँ के नाम या शासनाच्या भावस्पर्शी उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या नावाने रोपे लावून, त्यांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा निसर्गाशी नात्याचा नवा धागा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.



ज्ञानविकास विद्यालय, भराडी हे अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाचे एक प्रेरणादायी शिक्षणसंस्थान आहे. येथील विद्यार्थ्यांना 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाअंतर्गत शासनाच्या आवाहनानुसार वृक्षांची रोपे वाटप करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या नावाने हे रोप लावताना एक प्रकारचा जिव्हाळ्याचा भाव व्यक्त केला. यानंतर हे रोप जपण्याचे, त्याचे संगोपन करण्याचे आणि त्या झाडाशीही आईसारखे नाते टिकवण्याचे वचन दिले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ एक रोप दिले गेले नाही, तर त्यातून पर्यावरणाबद्दल प्रेम, जबाबदारी, आणि ममतेची जाणीव त्यांच्या मनात खोलवर रुजवली गेली. शिक्षणासोबतच निसर्ग जपणं ही आपली सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे, हे मूल्य या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवण्यात आले.

या उपक्रमासाठी आवश्यक रोपे शासनाच्या सूचनेनुसार वनविभागामार्फत पुरवण्यात आली. त्यासोबतच 'इको क्लब' स्थापन करण्यासाठी शाळा प्रशासनाने पुढाकार घेतला असून, लवकरच शाळा पातळीवर पर्यावरणपूरक उपक्रमांचा नियमित कार्यक्रम आखण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी लावलेली रोपे, त्यांचा फोटो आणि प्रगती संबंधित संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या कार्यवाहीसही सुरुवात झाली आहे.

या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. एक रोप म्हणजे केवळ झाड नव्हे, तर आईसारखी एक जिवंत जबाबदारी ही भावना विद्यार्थ्यांनी मनापासून स्वीकारली आहे. यामुळे नक्कीच पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यातील पिढी अधिक जागरूक व कटिबद्ध होईल, असा विश्वास शाळा प्रशासन व पालकांनी व्यक्त केला आहे.

# यावलीसह पंचक्रोशीतील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत; पिकांच्या वाढीवर परिणाम

**बार्शी । प्रतिनिधी**

बार्शी तालुक्यातील यावली हे शेतीप्रधान गाव तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाचं मोठं क्षेत्र असलेलं गाव मानलं जातं. येथे खरीप व रब्बी हंगामात विविध पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. यावर्षी मे महिन्यात सुरुवातीच्या सरी आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचं वातावरण निर्माण झालं होतं. त्यानुसार तुर, उडीद, सोयाबीन यांसारख्या पिकांची वेळेवर पेरणीही करण्यात आली.मात्र गेल्या महिन्याभरात पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्यामुळे यावलीसह परिसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. काही भागात तर पेरणी केलेल्या पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. शेतकऱ्यांना घरखर्च, शैक्षणिक गरजा आणि मागील हंगामातील कर्जाचे हप्ते भरायचे आहेत. मात्र हातात पीकच नसेल तर या जबाबदाऱ्या पार पाडणं त्यांच्यासाठी कठीण होणार आहे.या परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांना मागील वर्षीचा पीकविमा देखील अद्याप मिळालेला नाही. यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत आहे.



**आमचं संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर नाही झाला तर सगळं गणित बिघडतं. जर पिकं हातात आली नाहीत तर सरकारने आमचं ऐकावं आणि तात्काळ मदत करावी,**

**शेतकरी रामचंद्र (बापू) चव्हाण (यावली)**

# मालेवाडा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील मालेवाडा येथील जेतवन बुद्ध विहारात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १८ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक आणि प्रेरणादायी वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अभिवादन करत त्यांच्या साहित्य व कार्याचा गौरव केला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची, त्यांच्या लेखणीने केलेल्या सामाजिक जागृतीची आणि परिवर्तनकारी विचारांची माहिती देण्यात आली.

अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्य नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची दिशा देणारे ठरले आहे. दलित, वंचित, शोषित वर्गाच्या व्यथा, स्वप्ने आणि संघर्षाचे प्रबोधन त्यांनी आपल्या ओजस्वी लेखणीतून केले. त्यांच्या साहित्यातून समाजमनाला जाग येऊन परिवर्तनाचा अंकुर फुटला. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

आजही अनेक विद्यार्थी, अभ्यासक आणि संशोधक त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेत असून, त्यांच्या विचारांची दिशा नव्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरत आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे जनजागरण लोकमानसात रुजवण्याचे मोलाचे कार्य अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून केले, हे यावेळी उपस्थितांना नमूद करण्यात आले.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून दहा वर्षांत शेकडो कोटींची मदत

## सहा महिन्यांत विदर्भातील १,११३ रुग्णांना ९.६२ कोटींचे अर्थसहाय्य

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे तडफदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून २०१५ साली नागपूर येथील हैदराबाद हाऊस येथे स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांत शेकडो कोटी रुपयांची मदत गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यात आली आहे.



या कक्षाच्या कार्यकाळात विशेषतः विदर्भातील गरजू, गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांना मोठ्या प्रमाणात तातडीचे शासकीय आर्थिक सहाय्य मिळाले आहे. याबाबत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे प्रमुख व सदस्य सचिव सागर पांडे यांनी काल हैदराबाद हाऊस, नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीतच विदर्भातील अमरावती, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा आदी जिल्ह्यांतील एकूण १,११३ पात्र रुग्णांना तब्बल ९ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

वैद्यकीय खर्च वाढलेला असतानाही या कक्षामुळे गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळत आहे. विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी रुग्णांना तातडीने मंजुरी व मदत मिळावी यासाठी यंत्रणा सातत्याने कार्यरत आहे.

संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी लवकरच ऑनलाइन प्रणालीचे सॉफ्टवेअर अद्ययावत करण्यात येणार असल्याची माहितीही पांडे यांनी यावेळी दिली.

# आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आश्लेषा बागडे यांचा नाळे वस्ती येथे सत्कार;गावाचा गौरव वाढवला



**सोलापूर । प्रतिनिधी**

कझाकिस्तान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती आशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ५९ किलो वजन गटात कांस्य पदक पटकावत भारताचं आणि करमाळा तालुक्याचं नाव उज्ज्वल करणाऱ्या आश्लेषा कल्याण बागडे हिचा नाळे वस्ती येथे सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नाळे वस्ती येथे झालेल्या या सत्कार सोहळ्यात शाळेचे मुख्याध्यापक संतोष पोतदार, शिक्षिका अनुराधा शिंदे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी नाळे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जालिंदर नाळे यांनी आश्लेषा व तिचे वडील कल्याण बागडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.याप्रसंगी अश्विनी नाळे, पूजा नाळे, कैलास नाळे, काशीनाथ नाळे, बाळासाहेब येळे यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सत्काराला उत्तर देताना आश्लेषा बागडे म्हणाली, माझ्या यशामागे भावाचे मार्गदर्शन आणि आई–वडिलांचा मोलाचा पाठिंबा आहे. माझ्यावर कधीच मुलगी म्हणून बंधने घालण्यात आली नाहीत, त्यामुळेच मी आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचू शकले. श्रीगोंद्यातील हनुमंत फंड (इंटरनॅशनल कुस्ती संकुल) यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्या खेळाला दिशा मिळाली. ग्रामीण भागातील मुलांमध्ये अपार कौशल्य असते, फक्त जिद्द, चिकाटी आणि स्वप्न पूर्ण करण्याचा आत्मविश्वास हवा.आश्लेषा बागडे ही करमाळा तालुक्यातील पहिली आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू ठरली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यात अभिमानाचे वातावरण असून, भविष्यातील खेळाडूंना तिच्या कामगिरीतून प्रेरणा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.कार्यक्रमाच्या शेवटी अनुराधा शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अंबरनाथ तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण पुन्हा जाहीर

# मागासवर्गीयांसह अनुसूचित जाती–जमातींना मिळाली संधी

**बदलापूर । प्रतिनिधी**

अंबरनाथ तालुक्यातील २८ ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या कालावधीतील सरपंच पदाचे आरक्षण पुन्हा एकदा जाहीर करण्यात आले आहे. दोन महिन्यांपूर्वी यासंदर्भात आरक्षण सोडत घेण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या काही महत्त्वपूर्ण निर्देशांच्या पार्श्वभूमीवर शासनाने त्या आरक्षणासंदर्भात फेरविचार करून, १३ जून रोजी नव्याने अधिसूचना काढली आणि राज्यातील सर्व संबंधित तालुक्यांना आरक्षण सोडतीचे आदेश दिले. त्यानुसार अंबरनाथ तालुक्यातील महात्मा गांधी विद्यालयाच्या सभागृहात दिनांक १५ जुलै रोजी ही आरक्षण सोडत सभा उत्साहात पार पडली.



सभेच्या वेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते सरपंच पदाच्या आरक्षणासाठी चिठ्ठ्या काढण्यात आल्या. ही संपूर्ण प्रक्रिया उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली आणि तहसीलदार अमित पुरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. सभागृहात तालुक्यातील ग्रामस्थ, इच्छुक उमेदवार आणि स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण शांततेत होते, मात्र आरक्षण जाहीर झाल्यानंतर काही ठिकाणी समाधान व्यक्त करण्यात आले, तर काही गावांमध्ये अपेक्षा न मिळाल्यामुळे निराशा जाणवली. कही खुशी, कही गम अशीच अवस्था ग्रामपंचायत कार्यकर्त्यांमध्ये जाणवत होती. या फेर आरक्षण सोडतीनुसार अनुसूचित जातीसाठी दोन ग्रामपंचायतींची पदे आरक्षित करण्यात आली आहेत, त्यात बुर्दुल (स्त्री) आणि साई यांचा समावेश आहे. अनुसूचित जमातींसाठी तीन ग्रामपंचायती आरक्षित असून, त्यात डोणे (स्त्री), मांगरूळ आणि सागाव या गावांचा समावेश आहे. मागासवर्गीय प्रवर्गासाठी एकूण आठ ग्रामपंचायती आरक्षित आहेत, यामध्ये चार स्त्री प्रवर्गासाठी आहेत खरड, काकोळे, गोरेगाव आणि ढवळे–कुडसावरे तर मुळगाव, सावरे, मलंगवाडी आणि चामटोली या ग्रामपंचायती मागासवर्गीय सामान्य प्रवर्गासाठी ठेवण्यात आल्या आहेत.उर्वरित १५ ग्रामपंचायती सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुल्या आहेत. त्यातील आठ ग्रामपंचायती स्त्री आरक्षणासाठी आहेत ढोके–दापीवली, उसाटणे, राहटोळी, काराव, नाऱ्हेन, अस्नोली, आंबेशीव बु. आणि चरगाव तर सात ग्रामपंचायती खुल्या सर्वसाधारण प्रवर्गासाठी ठेवण्यात आल्या आहेत. त्यात नेवाळी, पोसरी, कान्होर, कासगाव, वांगणी, चोण आणि दहीवली यांचा समावेश आहे.या आरक्षण सोडतीमुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक गावांमध्ये राजकीय हालचालींना गती मिळण्यास सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार असून, काही ठिकाणी विद्यमान नेतृत्वासाठी ही सोडत धक्का ठरली आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडल्यामुळे आरक्षणासंबंधी कोणताही गोंधळ किंवा वाद निर्माण झाला नसल्याचे तहसीलदार अमित पुरी यांनी स्पष्ट केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# साहित्य वाटपातून शिक्षणाला बळकटी; अनिल घुगे यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण



**पिशोर । जावेद शेख**

निंभोरा गणातील जिल्हा परिषद शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करून त्यांच्यात शिक्षणाविषयी आत्मविश्वास व उत्साह निर्माण करण्याचा स्तुत्य उपक्रम शनिवार, दि. १९ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. आमदार संजनाताई जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते अनिल आप्पाराव घुगे यांच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.खातखेडा, रामनगर, साखरवेल, वासडी, निंभोरा, तपोवन, मेहगाव आणि हसता या गावांतील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, पाण्याची बाटली, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून खातखेडा येथे १५०, रामनगर येथे २००, साखरवेल येथे १०० विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळाला, तर इतर गावांतील विद्यार्थ्यांनाही साहित्याचे वितरण करण्यात आले.



या प्रसंगी बोलताना अनिल आप्पाराव घुगे यांनी सांगितले की, आमदार संजनाताई जाधव यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद गटातील प्रत्येक शाळेत २५ लाख रुपयांच्या निधीतून लवकरच डिजिटल लायब्ररीची उभारणी केली जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हा परिवर्तनाचा प्रमुख मार्ग असून, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले निवृत्त शिक्षक राजू मोकासे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, मी स्वतः जिल्हा परिषद शाळेतून शिक्षक म्हणून कारकिर्द केली. निवृत्तीनंतर समाजकार्याचा वसा घेतला असून, शिक्षणासाठी केलेला हा उपक्रम केवळ सुरुवात आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आम्ही पुढेही असे उपक्रम राबवणार आहोत.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायतींपासून ते स्थानिक शाळा व्यवस्थापन समित्यांपर्यंत सर्व स्तरांतील लोकप्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी सहकार्य केले. कार्यक्रमात सरपंच ज्ञानेश्वर पवार, विलास पवार, राजेंद्र पवार, दीपक आखाडे, दत्तू घाडगे, भगवान काजे, गजानन घुगे, प्रशांत नागरे, सुनील नवले, बंडू अण्णा, विनोद जाधव, ज्ञानेश्वर सोनवणे, देवमन घुगे, संतोष घुगे, गोविंद महाराज निकम, कारभारी खुर्द, कैलास खुर्द, पप्पू पवार, रमेश निर्मळ, प्रशांत निर्मळ, नंदू घुगे, संजय भागिनाथ घुगे, जितेंद्र अप्पाराव घुगे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या प्रवासात एक आशेचा किरण ठरला आहे. समाजातील विविध स्तरांतील नागरिकांनी या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले असून, भविष्यात असे उपक्रम अधिक व्यापक स्तरावर राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


# अण्णाभाऊ साठेंच्या स्मृतिदिनी अभिवादन भारतरत्न सन्मान देण्याची जोरदार मागणी

## दलित-वंचितांचा आवाज असलेल्या अण्णाभाऊंचा सन्मान म्हणजे संपूर्ण समाजाचा सन्मान-सुनिल सकट

**पाथर्डी । वजीर शेख**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६व्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धार्थनगर येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठेंना मरणोत्तर भारतरत्न सन्मान बहाल करण्याची मागणी केली.

कार्यक्रमाची सुरुवात माजी नगरसेवक मनेष साठे यांच्या हस्ते अण्णाभाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख सुनिल सकट, शासन पुरस्कारप्राप्त पोपटराव पाथरे, राजू घोरपडे, अशोक बागडे, पांडुरंग घोरपडे, संतोष शिरसाठ यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.



यावेळी बोलताना सुनिल सकट म्हणाले, अण्णाभाऊ साठेंनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजात नवचैतन्य निर्माण केले. दलित, शोषित, कामगार आणि वंचित घटकांच्या वेदना, स्वप्ने व लढ्याचं वास्तव त्यांनी आपल्या साहित्यातून प्रभावीपणे मांडले. त्यांच्या साहित्याचा सामाजिक परिवर्तनात मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न देणं ही संपूर्ण समाजाची मागणी आहे.

मनेष साठे यांनी अण्णाभाऊ साठेंच्या कार्यावर प्रकाश टाकत सांगितले की, अण्णाभाऊ हे फक्त साहित्यिक नव्हते, तर ते समाजाच्या वेदनांचे प्रवक्ते होते. त्यांनी वंचितांच्या हक्कांसाठी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित केलं. त्यांचे साहित्य हे आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे भारतरत्नचा सन्मान त्यांना मिळणं आवश्यक आहे, ही मागणी केवळ एका समाजाची नसून सर्व वंचित आणि श्रमिक समाजाची आहे.कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी अण्णाभाऊ साठेंच्या कार्याला अभिवादन करत त्यांचा आदरपूर्वक स्मरण केला. भारत सरकारने त्यांना भारतरत्न बहाल करावा, ही सामूहिक मागणी यावेळी पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली.


# महाराष्ट्र शासनाने महसूल जमिनी वरील अतिक्रमकांना सुरू केलेली नोटीस देण्याची प्रक्रिया थांबवावी

## शेतकरी संघटनेचे नेते माजी आमदार ॲड.वामनराव चटप यांची मागणी

**राजुरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सरकारने शेतक-यांची ३५ वर्षापासून असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करून जबरानजोत शेतकऱ्यांना शेतजमिनीच्या मालकीचे पट्टे द्यावे आणि हा निर्णय होईपर्यंत राज्य सरकार ने सुरू केलेली शेतक-यांना नोटीस देण्याची प्रक्रिया तातडीने थांबवावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते माजी आमदार ड. वामनराव चटप यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासनाने प्रथम शासन निर्णय घेऊन महसूल जमिनीवरील अतिक्रमकांचे सन १९७८ पर्यंतची सर्व अतिक्रमणे नियमित करून त्यांना मालकी पट्टे दिलेले आहेत. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी शताब्दी वर्ष १९८९ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी वर्ष १९९० निमित्त शासननिर्णय करून १४ एप्रिल १९९० पर्यंतची सर्व अतिक्रमणे नियमानुकूल करून जबराजोत शेतकऱ्यांना मालकी पट्टे दिले आहेत परंतु, त्यानंतर कोणताही शासन निर्णय झालेला नाही.



बहुअंशी शेतकऱ्यांची अतिक्रमणे ३५ वर्षापेक्षा जास्त कालावधीची असून त्यांचा त्या जमिनीवरील ताबा व कास्त सततचा, कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय मालकासारखा व हक्क म्हणून आहे. यामुळे या शेतक-यांनी वारंवार जबरानजोत शेतीचे पट्टे देण्याची मागणी केली आहे. हे सर्व भूमिहीन शेतकरी असून त्यांना मालकी पट्टे देण्याचे दृष्टीने शासनाने व्यापक जनहित लक्षात घेऊन व त्यांचे तेच उपजीविकेचे साधन असल्याने ही त्यांची गरज लक्षात घेऊन तातडीने शासन निर्णय करावा आणि त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करून जबरानजोत शेतकऱ्यांना मालकी पट्टे देऊन मालक करावे व तो निर्णय होईपर्यंत सुरू केलेली नोटीस देण्याची प्रक्रिया तातडीने थांबवावी आणि त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते माजी आमदार ड. वामनराव चटप यांनी शासनाकडे केली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त १०वी-१२वी गुणवंतांचा २२ जुलैला गौरव



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, चंद्रपूरमध्ये इयत्ता १०वी व १२वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सन्मान सोहळा २२ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याचे आयोजन सायंकाळी ४ वाजता कन्यका मंदिर सभागृह, चंद्रपूर येथे होणार असून, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर हे असणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या सन्मान सोहळ्याला भाजपाचे महानगर पदाधिकारी, माजी नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, विविध शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रमुख, पालकवर्ग आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचे संयोजन भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहीर यांनी केले असून, त्यांनी शहरातील नागरिकांना या सन्मान सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# देशपातळीवर इंदापूरची स्वच्छ भरारी-स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये महाराष्ट्रात प्रथम, देशात पाचवा क्रमांक

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

इंदापूर नगर परिषदेने स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत संपूर्ण देशात नाव कमावले आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत दरवर्षी घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये इंदापूर शहराने उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक, तर देशात पाचवा क्रमांक पटकावला आहे. ही कामगिरी देशभरातील १५८१ शहरांमध्ये झालील्या मूल्यमापनावर आधारित असून, २० ते ५० हजार लोकसंख्येच्या गटात इंदापूरने सर्वोत्तम कामगिरी केली आहे.

स्वच्छतेच्या विविध निकषांमध्ये इंदापूर शहराने आपला ठसा उमटवला आहे. शहरातील घराघरातून कचरा संकलन, ओला व सुका कचरा यांचे योग्य विलगीकरण, कचऱ्याच्या प्रक्रिया केंद्रांची कार्यक्षमता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता आणि त्यांचे सुशोभीकरण, जलस्रोतांचे जतन तसेच नागरिकांच्या सहभागाने राबवलेले विविध स्वच्छता उपक्रम या सर्व बाबींमध्ये इंदापूर नगर परिषदेने अत्यंत नियोजनबद्ध आणि सक्रिय भूमिका बजावली आहे.

या यशाबद्दल नगर परिषद कार्यालयात मोठा उत्साहाचे वातावरण होते. नगर परिषदेतर्फे फटाके फोडून आणि पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.




यावेळी बोलताना मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी सांगितले की, ही कामगिरी केवळ नगर परिषदेची नव्हे, तर इंदापूर शहरातील प्रत्येक नागरिकाची आहे. नागरिकांच्या सहकार्याने, कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांनी आणि स्वच्छतेप्रती असलेल्या जागरूकतेमुळेच हे यश शक्य झाले आहे. हा सन्मान संपूर्ण इंदापूरचा आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत इंदापूर शहराला थ्री स्टार कचरामुक्त शहर मानांकन आणि जऊ++ प्रमाणपत्र मिळाले आहे. या सन्मानामुळे शहराचा नावलौकिक राज्यातच नव्हे तर देशपातळीवर झळकला आहे. या यशामुळे इंदापूर नगर परिषदेच्या नियोजनशून्य कारभाराऐवजी दूरदृष्टी असलेले प्रशासन आणि नागरिकांच्या समन्वयातून साधलेली स्वच्छता या सकारात्मक प्रतिमेला बळ मिळाले आहे.इंदापूर नगर परिषदेच्या या यशात माजी मुख्याधिकारींचा देखील मोलाचा वाटा आहे. गेल्या काही वर्षांपासून शहरात स्वच्छतेसंदर्भात घेतलेले उपक्रम, घंटागाडी सेवा, घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता जनजागृती मोहिमा यांचा सकारात्मक परिणाम आज दिसून आला आहे. याशिवाय, स्थानिक आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शासनाच्या विविध निधींच्या प्रभावी वापरातून हे यश अधिक साकार झाल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी याप्रसंगी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी अजय चरडे यांच्यासह सर्व नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, सफाई कामगार आणि नागरिकांचे विशेष आभार मानले आहेत. त्यांनी पुढील काळात इंदापूर शहर स्वच्छतेच्या बाबतीत देशातील अव्वल ५० शहरांमध्ये स्थान मिळवेल असा विश्वास व्यक्त केला.

# शेतकऱ्यांना वीज कृषी पंप जोडणीसाठी शिवसेनेचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा;कोळसा खाणग्रस्त भागात सौर कृषी पंप अपयशी

## शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून दिले निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील व वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांना सौर कृषी पंप न देता थेट थ्री-फेज वीज कृषी पंप जोडणी द्यावी, तसेच १ मार्च २०२१ नंतर महावितरणकडे अर्ज करून डिमांड भरलेल्या असूनही वीज जोडणीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ वीजपुरवठा करण्यात यावा, या मागण्या घेऊन शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन दिले आहे. हे निवेदन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले.चंद्रपूर जिल्हा व वरोरा-भद्रावती परिसर हा वेकोलीच्या अनेक कोळसा खदानींनी व्यापलेला असून, या भागातील भूगर्भातील पाण्याची पातळी अत्यंत खोलवर गेली आहे. अशा स्थितीत सौर कृषी पंप कार्यक्षम ठरत नसून, खोल बोअरवेलमधून पाणी खेचण्यासाठी आवश्यक दाब निर्माण होत नसल्याने सिंचनासाठी सौर पंपांचा उपयोग होऊ शकत नाही. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना सौर कृषी पंप ऐवजी थ्री-फेज वीज पंप जोडणीची नितांत आवश्यकता आहे. महावितरणकडून सध्या या शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचा प्रस्ताव मांडला जात आहे, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेता ही योजना प्रभावी ठरत नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार पर्याय निवडण्याचा अधिकार असावा, त्यामुळे सौर कृषी पंप योजना ऐच्छिक ठेवण्यात यावी आणि कोणत्याही शेतकऱ्यावर ती सक्तीने लादू नये, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.तसेच, चंद्रपूर जिल्ह्याची विशेष परिस्थिती लक्षात घेऊन आणि वेकोली खदानींमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, या भागासाठी स्वतंत्र कृषी वीज धोरण आखावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांच्या वीज जोडण्यांचा प्रश्न मार्गी लावून त्यांना थेट वीज पंप जोडणी देण्यात यावी, जेणेकरून त्यांचे शेती कार्य सुरळीत होईल आणि उत्पादनात वाढ होईल, असा उद्देश या निवेदनामागे आहे.या निवेदनाच्या माध्यमातून शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनी शासनाचे लक्ष शेतकऱ्यांच्या मूळ समस्येकडे वेधले असून, शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



# स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेत मूल नगर परिषदेची मुसंडी;जिल्ह्यात अव्वल,राज्यात ६५ वा क्रमांक!

**मूल । प्रतिनिधी**

देशभरातील शहरे स्वच्छ आणि सुंदर बनावीत, नागरिकांना स्वच्छतेची सवय लागावी, आणि आरोग्यसंपन्न समाज निर्माण व्हावा या उद्देशाने केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत दरवर्षी स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा राबवली जाते. यंदा २०२४ सालच्या स्वच्छ सर्वेक्षणामध्ये मूल नगर परिषदेला उल्लेखनीय यश प्राप्त झाले असून, जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांमध्ये मूल शहराने प्रथम क्रमांक पटकावला आहे.या स्पर्धेत मूल शहराने ९०८६ गुणांची कमाई करत राज्यात ६५ वा, तर देशभरात ११२ वा क्रमांक मिळवला आहे. याशिवाय शहराला ODF++ (मुक्त शौच व खुल्या शौचालय व्यवस्थापन) दर्जा सुद्धा प्राप्त झाला आहे.

या यशामध्ये नागरिक, नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, सफाई कर्मचारी आणि स्थानिक प्रशासनाच्या अथक परिश्रमांचा मोलाचा वाटा आहे. मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी या यशाचे श्रेय शहरातील प्रत्येक नागरिकासह नगरपरिषदेच्या टीमला दिले.

हे यश केवळ क्रमांकाचे नाही, तर आपल्या सामूहिक दृष्टिकोनाचे फलित आहे. भविष्यात आणखी स्वच्छता वाढवण्यासाठी आपण झपाट्याने काम करू. घराघरातून निघणारा ओला व सुका कचरा वेगळा करून द्यावा, ही नागरिकांकडून अपेक्षा आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच मूल शहर देशात अव्वल ५० नगर परिषदेपैकी एक होऊ शकेल, असा विश्वास मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी 'दैनिक सह्याद्रीचा राखणदार शी बोलताना व्यक्त केला.

नगर परिषदेच्या वतीने शहरात गेल्या काही वर्षांत घनकचरा व्यवस्थापन, घंटागाडीद्वारे कचरा संकलन, स्वच्छता जनजागृती, सार्वजनिक स्वच्छतागृहांची निर्मिती यांसारख्या उपक्रमांवर भर देण्यात आला. या कार्यात मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी विशेष पुढाकार घेतला.या यशाबाबत समाधान व्यक्त करताना मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी उपविभागीय अधिकारी व प्रशासक अजय चरडे यांचे तसेच नगर परिषदेचे माजी मुख्याधिकारी, सर्व कर्मचारी, आणि जागरूक नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.मूल नगर परिषद ही विद्यमान आमदार तथा माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विधानसभा क्षेत्रात येते. त्यामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी, योजनांचे मार्गदर्शन आणि सहकार्य वेळोवेळी मिळत असल्याचे प्रशासनाने नमूद केले. याशिवाय, पूर्वी कार्यरत असलेल्या मुख्याधिकाऱ्यांचेही योगदान मूलगामी असल्याची कबुली देण्यात आली.




### नवीन उंची गाठण्याचा निर्धार

**या यशामुळे मूळ शहरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शहराला स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी भविष्यातही हेच सातत्य ठेवून आणखी उंची गाठण्याचा निर्धार नगरपरिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.**

# जुना धामणगावच्या विकासावरून वाद शिगेला वैभव देशमुख यांचा परिक्षीत जगताप यांना टोला

## कामांचा दर्जा दाखवत असताना आत्मपरीक्षण करा–भाजप नेत्याचा पलटवार

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

जुना धामणगावच्या विकासकामांवरून काँग्रेस व भारतीय जनता पक्षामध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी रंगू लागल्या आहेत. काँग्रेसचे नेते तथा पंचायत समिती सभापती परिक्षीत जगताप यांनी केलेल्या आरोपांवर भाजपचे वैभव देशमुख यांनी तीव्र प्रतिक्रिया देत, दर्जाहीन कामांची दुजोरा देताना परिक्षीतजींनी आधी आत्मपरीक्षण करावे, असा स्पष्ट टोला लगावला आहे. देशमुख म्हणाले की, धामणगाव रेल्वे पंचायत समितीवर काँग्रेसची सत्ता असून, सभापतीही जुना धामणगावचेच असताना गेल्या पाच वर्षांत झालेल्या कामांचा दर्जा पाहायचा असेल, तर फक्त जुना धामणगावचीच पाहणी पुरेशी आहे. आजवरच्या कामांवरून काँग्रेसचा कार्यक्षमतेचा आरसा स्पष्टपणे जनतेसमोर आला आहे, असा आरोप त्यांनी केला.

तसेच, स्वतः आमदार, जिल्हा परिषद व नगरपरिषदेवर सत्ता असतानाही चांदूर रेल्वे नगरपरिषदेचा दीर्घकालीन पाणी प्रश्न सोडवता न आलेल्या नेतृत्वावर जुना धामणगावच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचं श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे हास्यास्पद व निंदनीय आहे, असेही देशमुख यांनी ठणकावले.

२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतरच जुना धामणगावच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळाली, हे अधोरेखित करत देशमुख म्हणाले की, याचे खरे श्रेय भाजप नेते अरुण अडसड व तत्कालीन आमदार प्रतापदादा अडसड यांचे आहे. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून ही योजना मंजूर करून घेतली.



इतकेच नव्हे तर वाढीव पाईपलाईनसाठी आवश्यक निधीही आमदार प्रतापदादांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून मिळवला, हे येथील नागरिकही जाणून आहेत, असे देशमुख यांनी स्पष्ट केले. पंधरा वर्षे सत्तेत राहून काँग्रेसने जुना धामणगावसाठी काय केले याचा अहवाल परिक्षीत जगताप यांनी द्यावा. आम्ही मात्र आमदार प्रतापदादांनी पाच वर्षांत केलेल्या कामांचा ठोस अहवाल सादर करू. तो पाहिल्यावरच जनतेला खरी परिस्थिती लक्षात येईल. पंधरा वर्षांच्या तुलनेत केवळ पाच वर्षांत दुप्पट कामे आमदार अडसड यांनी केली आहेत, हे यातून सिद्ध होईल,असा दावा देशमुख यांनी केला.

अखेरीस वैभव देशमुख यांनी परिक्षीत जगताप यांना थेट सवाल करत म्हटले की, तुमच्याकडे पंचायत समिती सदस्यपद, सभापतीपद, काँग्रेसची सत्ता असूनही जुना धामणगावच्या विकासात अडथळा कोण होता? मग पाच वर्षे निष्क्रियतेचं कारण काय?

या वक्तव्यानंतर धामणगाव परिसरातील राजकारण चांगलेच तापले असून, आगामी काळात दोन्ही बाजूंनी यावर अधिक प्रत्युत्तरांची शक्यता आहे. जनतेच्या न्यायाची चाचणी येत्या निवडणुकांमध्येच लागणार हे निश्चित!

## बेकायदेशीर बाईक टॅक्सीमार्फत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगरात काही प्रवासी अवैध मार्गाने बाईक टॅक्सीच्या माध्यमातून प्रवास करत असल्याचे निदर्शनास आले आहे, तशा परिवहन विभागाकडे तक्रारी देखील प्राप्त झाल्या आहेत . त्या अनुषंगाने तातडीने तपास सुरू करण्यात आला. यामध्ये काही अप्रमाणित प्स व बेकायदेशीर बाईक टॅक्सी चालकांकडून शासनाच्या कोणत्याही परवानगीशिवाय प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे समोर आले आहे. यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होतेच, शिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होतो.

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ९३ नुसार, कोणत्याही प्रवासी वाहतूक सेवेच्या संचालनासाठी आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, काही प कंपन्या व चालक हे नियम धाब्यावर बसवत बेकायदेशीर वाहतूक करत असल्याचे उघड झाले आहे.या पार्श्वभूमीवर, क्षेत्रीय परिवहन कार्यालय (ठढज), मुंबईच्या विशेष पथकांनी २० युनिट्समार्फत एकाच वेळी मुंबई, ठाणे, वसई, वाशी, पनवेल येथे संयुक्त कारवाई मोहीम राबवली. सदर मोहिमेमध्ये एकूण १२३ बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली असून



त्यातील ७८ बाईक टॅक्सी जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच, संबंधित चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून अवैध प ऑपरेटरविरोधातही पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# डेंगू हिवताप जनजागृतीसाठी कवठा रेल्वेत दिंडी कार्यक्रम संपन्न

**पुलगाव । प्रतिनिधी**

डंक छोटा, धोका मोठा या घोषवाक्याखाली डेंगू व हिवताप यासारख्या कीटकजन्य रोगांविषयी जनजागृती करण्यासाठी कवठा रेल्वे येथे दिंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत व राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.या दिंडी कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व हिवताप नियंत्रण अधिकारी डॉ. नलिनी विखे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत वाडीभस्मे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगावच्या डॉ. रेश्मा बोरबोरे व डॉ. अदिती लांबट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.दिंडीमध्ये कवठा रेल्वे येथील प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, महिला भजनी मंडळ, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. येता कणकण, तपास करा रक्तदान, गप्पी मासे पाडा, डेंगू हिवताप टाडा अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. गावभर फेरी काढून दिंडीचा समारोप कवठा रेल्वे प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात करण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थितांना नाश्ता वितरित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीएचओ प्राचू अवधरे, शाळेचे मुख्याध्यापक मोहन बहादुरे, शिक्षक सतीश शेवतकर, ज्योश्ना कांबळे, प्रकाश राठोड, आरोग्य सहाय्यक श्याम जोशी, स्वाती घोंगडे, दिलीप फुटाणे, आरोग्य सेविका सुनिता श्रीवास्तव (मगर), रूपाली नंदेश्वर, आरोग्य सेवक रवींद्र भोगे, संतोष परडे, संजय पिंपळकर, पंकज मेश्राम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.आशा स्वयंसेविका ताराबाई अंबाडेरे, अरुणा वाघमारे, ज्योती भोंगाडे, दिपाली नेहारे, सरपंच अंकुश मडावी, पोलीस पाटील ज्ञानेश्वर दिवाणे, आंगणवाडी कर्मचारी, तसेच बाल अनुसया माता भजनी मंडळ, राधे राधे दुर्गा मंडळ, कवठा रेल्वे उच्च प्राथमिक शाळेचे विद्यार्थी यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.या उपक्रमाच्या माध्यमातून डेंगू व हिवताप प्रतिबंधासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी जनजागृती करण्यात आली.




# वृक्षदिंडीचे अभिनव विचार मंच हिंगणघाटतर्फे उत्साही स्वागत–फुलांचा वर्षाव आणि मिष्टान्न वाटप



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची बीजं रोवण्याच्या उद्देशाने विद्यार्थी सहाय्यक समिती वरोरा व पर्यावरण संवर्धन संस्था हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ जुलै २०२५ रोजी भव्य वृक्षदिंडी सोहळा आयोजित करण्यात आला. या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वृक्षदिंडीची मूळ संकल्पना थोर कवी डॉ. रवींद्रनाथ टागोर यांनी मांडली होती. त्यांच्या कार्याला पुढे नेत श्रद्धेय बाबा आमटे यांनी आनंदवनात या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले. त्याच प्रेरणेतून, बाबा आमटे यांच्या जन्मस्थळी - हिंगणघाट येथे - दरवर्षी वृक्षदिंडी राबवली जाते, ज्यातून विद्यार्थ्यांना निसर्गाकडे सौंदर्यदृष्टीने पाहण्याचा दृष्टिकोन मिळतो.

या वृक्षदिंडीचे अभिनव विचार मंच हिंगणघाट तर्फे तहसील कार्यालय चौकात पारंपरिक पद्धतीने फुलांचा वर्षाव व विद्यार्थ्यांना मिष्टान्न वाटप करून स्वागत करण्यात आले.

या वेळी मंचाचे कार्यकर्ते नितीन सुकळकर, चंद्रशेखर रेवतकर, विकास नागरकर, विजय धात्रक, किरण गहेरवार, बाबाराव मस्कर, किशोर कुंभलकर, विशाल मुटे, एडवोकेट रवींद्र मद्दलवार, बालविकास अधिकारी अमोल चिरुटकर, सचिन शिरपूरकर, किशोर उकेकर, पद्माकर आत्राम, यशवंत गडवार, सचिन कापकर, हेमंत महाजन, गौरव तांबोळी, निलेश बिडकर, स्वयंम तांबोळी यांची उपस्थिती लाभली.

संपूर्ण कार्यक्रमाने शहरात सकारात्मक ऊर्जा आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण केली. विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग संवर्धनाबाबत अभिमानाची भावना निर्माण करणारा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय ठरला.

## महाराष्ट्रातील दोन 'सेना' एकत्र: एकनाथ शिंदे यांना आनंदराज आंबेडकरांची साथ



**मुंबई (वृत्तसंस्था)**–आनंदराज आंबेडकर यांचा रिपब्लिकन सेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना पक्ष यांच्या युतीची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून या युतीची चर्चा होती. आज एकनाथ शिंदे आणि आनंदराज आंबेडकर यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत आपल्या युतीची अधिकृत घोषणा केली. शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येत प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे या वेळी या दोन्ही नेत्यांनी सांगितले.लोकांच्या भल्यासाठी आम्ही एकत्र आलो असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आमच्यात एकमेकांबद्दल विश्वास असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या महाराष्ट्रातील दोन सेना आहेत. शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही रस्त्यावर अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सेना असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. यातील एक सेना बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी असून दुसरी सेना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच आमच्यात एकदम चांगले जमेल, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी युतीची घोषणा केली आहे.